EIIRJ ISSN-2277-8721 Mar – April 2019 Volume-VIII, Issue-II

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक धोरण

**प्रा. रामकुमार प्रधान,**
*एस.एन.डी.टी. महिला व एस.सी.बी. वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, मुंबई.*

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमहत्व बहुआयामी आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून जागतिक कीर्ती असली तरी त्यांचा वेगवेगळया क्षेत्रातिल व्यासंग फार मोठा आहे. त्यांच्या या व्यासंगाच्या अनेक छटा आहेत. अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ, सामाजाशास्त्रज्ञ,कायदे पंडित, महान नेते असे विविध क्षेत्रात महान कार्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य दलित, आदिवासी, अडाणी आणि अंधकारमय झालेल्या लोकांना सक्षम बनविण्यासाठी होते. या बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार क्षेत्रात कामगारांसाठी विविध सोयी व तरतुदी करून फार मोठा बदल घडवून आणला. प्रस्तुत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार वर्गा करिता केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## स्त्री कामगारांसाठी कल्याणकारी धोरण:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली “अखिल भारतीय दलित वर्ग महिला परिषदेचे दुसरे अधिवेशन नागपूर येते २० जुलै १९४२ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात कामगार आणि अस्पृश्य स्त्रीयांच्या बाबतीत पुढील ठराव पास करण्यात आले होते.

१. स्त्रिया शिक्षणात मागासलेल्या असल्याने त्यांच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रांतिक सरकारांना प्रत्येक इलाक्याच्याठिकाणी ५० मुलींचे वसतिगृह सरकारी खर्चाने काढावे.
२. दारिद्रयात असलेया अस्पृश्य वर्गातील मुलींच्या दुय्यम व उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी सर्व सरकारी व निमसरकारी शाळांमधून फ्रीशिप व स्कॉलरर्शीप देण्याची तरतूद प्रत्येक प्रांतिक सरकारांनी करावी.
३. अस्पृश्य वर्गातील स्त्रियांचा अशिक्षित व मागासलेपणा प्राथमिक शिक्षणाची योजना तयार करून टी ताबडतोब अंमलात आणावी.
४. भारतामध्ये इतर वर्गाप्रमाणे गिरणी कामगार स्त्रिया, बिडी कामगार स्त्रिया, नगरपालिका तसेच रेल्वे कामगार स्त्रिया कारखान्यात काम करीत असत त्यांच्या साठी १. वर्षातून २१ दिवसाची कॅजुअल रजा २.काम करत असताना दुखापत झाली तर वाजवी नुकसानभरपाई मिळावी.याशिवाय २० वर्ष नोकरी झाल्यानंतर कमीतकमी दरमहा १५ रुपये पेन्शन त्या-त्या संस्थेकडून कायद्याने देण्याची योजना करण्याची तजवीज करावी.
५. कामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या स्त्री कामगारांवर देखरेख ठेवण्यासाठी पुरुष नेमले जात होते. त्यामुळे स्त्री कामगारांना अनेक प्रसंगी जुलूम व अत्याचार सोसावा लागतो. म्हणून गिरण्यात व

इतर ठिकाणी काम करणाऱ्या स्त्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी स्त्री कामगारच नेमण्याची तरतूद सरकारने कायद्याने करावी.

६. ज्या प्रमाणे मध्यवर्ती व प्रांतिक कायदे मंडळावर तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर स्त्री प्रतिनिधी घेतला जातो त्याचप्रमाणे अस्पृश्य वर्गातील स्त्रियांची सर्वांगीण प्रगती करण्यासठी त्यांचे प्रतिनिधी वरील सर्व ठिकाणी राखीव जागांद्वारेघेण्याची तरतूद सरकारने कायद्याने करावी.

हे ठराव म्हणजे केवळ अस्पुश्यच नव्हे तर संपूर्ण स्त्री कामगार गटाला मानवी हक्क मिळवून देणारे प्रभावी अस्त्र होते.

## खाण - प्रसूती लाभ कायदा : १९४१

- स्त्री कामगारास ८ आठवड्याचा लाभ ८ आणे प्रतिदिन या दरानुसार द्यावा.
- प्रसुतीपुर्वीचे पहिले ४ आठवडे स्त्री कामगार स्वच्छेने आराम न करता काम करून पूर्ण वेतन मिळवू शकेल.
- आरमाकरिता कामावरून गैरहजर राहिल्यास टी प्रसूती लाभ प्राप्त करू शकेल.
- प्रसूती नंतरचा ४ आठवड्याचा कालावधी हा आरामाचा असेल.
- त्या अवस्थेत तिचे काम करणे गैरकायदेशीर आणि गुन्हा आहे. म्हणून अशा अवस्थेतील कोणत्याही स्त्री कामगाराने काम करू नये.
- या कालावधीत तिला केवळ प्रसूती लाभावरचा संतुष्ट राहवे लागेल.

प्रस्तुत कायदा योग्य वाटत असला तरी त्यातील काही त्रुटीमुळे प्रत्यक्षात या कायद्याचा लाभ मिळविण्याकरिता स्त्री कामगारांना अडचणी निर्माण होत असत.या त्रुटी लक्षात घेऊन त्या दूर करण्याच्या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी 'खान-प्रसूती लाभ विधेयक' केंद्रीय सभागृहात मांडला.

## खाण-प्रसूती लाभ विधेयक: १९४३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या सुधारणा:

- या कायद्यात कामावरून गैर हजर असे शब्द असून ते असंदिग्ध व अस्पष्ट आहेत.
- समजा कोणत्याही विशिष्ट दिवशी खाणीच्या मालकाने लहान बंद ठेवली तर त्या दिवशी स्त्री कामगारास प्रसूती लाभ मिळविण्याचा अधिकार नाही. कारण या कायद्यामधील ' कामावरून गैरहजर' या शब्दाची असंदिग्धता होय.
- याशिवाय या शब्दाचा अर्थ असाही निघतो कि, काम आहे परंतु जर खाण बंद केली तर काम नाही.

- म्हणूनच हा शब्द कायद्यातून वगळण्यात यावा. ज्यामुळे स्त्री कामगारांना खाण प्रसूती लाभ कायदा चा फायदा घेता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हे ‘खाण-प्रसूती विधेयक’ संसदेत मंजूर करण्यात आले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धनबाद येथील कामगार वस्तीला भेट :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर मंत्री असताना त्यांनी देशातील वेगवेगळ्या खाणीची पाहणी केली त्यापैकी धनबाद येथील खाणीस १ डिसेंबर १९४३ रोजी भेट देऊन जमिनीपासून ४०० फुट खोल असलेल्या खाणीत ते स्वत: गेले आणि तेथील स्त्री कामगारांच्या मजुरी, सोयी सवलती, भोजाचे स्वरूप,प्रमाण याविषयी अनेक छोटे-मोठे प्रश्न विचाले. तसेच कामगारांच्या वस्तीला भेट दिली.

**कामगार कल्याण निधी :**

१५ फेब्रुवारी १९४४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘कोळसा खाण कामगार कल्याण अध्यादेश’ काढला. कोळसा खाण कामगारांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी कल्याण निधी असला पाहिजे, तरच कामगार कल्याणाच्या विविध कार्यक्रमाना प्रोत्साहन मिळेल. त्यांची भूमिका होती.हा अध्यादेश त्वरित लागू करून पुढील तरतुदींचा समावेश होता.

अ. भारताच्या कोळसा खाणीतून रेल्वेमार्फत पाठविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या कोळसा व कोक्कर केंद्रसरकार कर लावेल. ज्याचा दर हा वेळोवेळी निर्धारित केला जाईल.

ब. सल्लागार समितीसी विचार विनिमय करून नंतर भारतीय गझेटमध्ये प्रकाशित केला जाईल.

क. हा कर प्रती टन १ आण्यापेक्षा कमी नसेल आणि ४ आण्यापेक्षा जास्त राहणार नाही.

कोळसा खाण कामगार कल्याण अध्यादेशाद्वारे केंद्रसरकारला एक ‘सल्लागार समिती’ गठीत करण्याचा अधिकार देण्यात आला. ज्या मध्ये कोळसा खाणीचे मालक तसेच कोळसा खाण कामगार या समितीचे सदस्य राहतील असे सुचविण्यात आले. या सल्लागार समितीमध्ये एक महिला प्रतिनिधी आवश्यक आहे. असेही सुचविण्यात आले.या शिवाय पुढील कामगार कल्याण कार्यक्रमासाठी पैसा देण्याची तरतूद करण्यात आली.

१. कामगारांना घर देणे. २. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे. ३. शैक्षणिक सोयीमध्ये सुधारणा करणे. ४. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेमध्ये सुधारणा करणे. ५. रोगराई वर प्रतिबंध करणे. ६.कामगाराच्या राहणीमानाचा स्तर उंचावणे, ज्यामध्ये पोषण, सामाजिक परीस्थितीत सुधारणा इत्यादीचा समावेश होता.

**समान वेतन कायदा:**

पुरुष आणि स्त्रिया यांच्या मध्ये अधिकार आणि हक्कांच्या संदर्भात कोणताही भेदाभेद करू नये. या अनुषंगाने कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना पुरुष कामगाराएवढेच वेतन मिळाले पाहिजे. कारण या दोघांच्याही श्रमाची काम करण्याची क्षमता सारखीच आहे. असे डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांचे मत होते. ८ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले. या दिवशी स्त्री-कामगारांना सुध्दा पुरुष कामगारा इतकेच वेतन देण्याचा कायदा पास करण्यात आला.

**कारखाना विधेयक १९४६:**

१२ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी' कारखाना विधेयकमांडले.प्रस्तुत विधेयकानुसार असे सुचविण्यात आले कि, वर्षभर चालणाऱ्या कारखान्यातील कामाचे अधिकतम तास जे १९३४ च्या कारखाना कायद्यानुसार ५४ प्रती आठवडा होते. ते.४८ प्रती आठवडा करावे.तसेच हंगामी कारखान्यातील कामाचे तास जे पूर्वी ६० प्रती आठवडा होते ते ५४ प्रती आठवडा करावे. अशा सूचना सुचविण्यात आल्या. प्रस्तुत विधेयक सिलेकट  कमिठी कडे पाठविण्यात आले. त्यानंतर ४ एप्रिल १९४६ रोजी हे विधेयक पास करण्यात आले.

**सारांश :**

'कामगारांचे सरकार आल्याशिवाय कामगारांचे कल्याण साधले जाऊ शकत नाही' असे त्यांचे मत होते. त्यांनी मांडलेले कामगार विषयक विचारांकडे कामगारांच्या वर्मानकालातील तसेच भविष्यकाळातील समस्यांवरील उपाय म्हणून बघितले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्वाचे काम केलेच पण त्यहिपेक्षा त्या प्रत्येक समस्येवर उपाय सुचवून आपल्या विद्वता व हजरजबाबीपणा या गुणांच्या सहायाने त्यावेळच्या सरकारला बहुतेक उपाययोजना मान्य करण्यास भाग पाडले. भारतातील कामगार कायदे, कामगार धोरणे व कामगार कल्याणाची व्यवस्था आज अस्तित्वात व कार्यरत आहे त्याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केली असे दिसून येते.

**संदर्भ सूची:**

१.कीर धनंजय, १९६६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन,मुंबई.

२.गायकवाड संदीप,(संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-१८,१९,२०, क्षितिज प्रकाशन,नागपूर.

३. मनोहर यशवंत, १९९१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, नागपूर विध्यापीठ नागपूर.

४. काटकर राजेंद्र, २००९, आंबेडकर वाद, सुधीर प्रकाशन,वर्धा.

५. जाधव नरेंद्र, २०१२, बोल महामानवाचे(खंड दोन),पहिली आवृत्ती, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

६. आगलावे प्रदीप,सम्राट, दिनांक ८,९,व १० डिसेंबर,२००५.